MANAGER

स्थापना १९९७

पारिजात

को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्र.: टी.एन.ए.(टी.एन.ए.)/ आर.एस.आर.(सी.आर.)/९५१ सन १९९७



गुढी सहकाराची...

प्रगतीच्या नवनवीन उच्चाकांची...

₹ १०१ कोटी

(संमिश्र व्यवसाय)

१६ वा

वार्षिक अहवाल

सन २०१२-२०१३

प्रशासकीय कार्यालय :

पारिजात भवन, प्लॉट नं.१८, सेक्टर १० ए,

नेरुळ (प.), नवी मुंबई-४०० ७०६.

विद्यमान संचालक मंडळ



श्री. कृष्णा पां. धुमाळ
अध्यक्ष



श्री. श्रीपती शं. गरुड
उपाध्यक्ष



श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव




श्री. दिपक शं. टेळ
खजिनदार



श्री. कैलास वि. खोपडे
संचालक



श्री. अनंत ना. प्रभाळे
संचालक



श्री.अमृत दा. पाटील
संचालक



श्री. आनंदा बा. आंबवले
संचालक



श्री. शंकर रा. पुली
संचालक



सौ. मंदाताई ज्ञा. खोपडे
संचालिका



श्री. सचिन य. रणनवरे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री. तानाजी गु. शिंदे
व्यवस्थापक

पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि.नं. टी.एन.ए./(टी.एन.ए.)/आर.एस.आर.(सी.आर.) ९५१ सन १९९७

प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, प्लॉट नं.१८, सेक्टर-१० ए, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६.

सोळाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची **सोळावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ११/ ०८ / २०१३ रोजी सकाळी १०.०० वाजता गुरव ज्ञाती भवन, २-सी/३, सेक्टर ९-ए, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा पां. धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

सभेपुढील विषय

१) दि. १२/८/२०१२ रोजी झालेल्या पंधराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे व दि. १५/४/२०१३ रोजी झालेल्या विशेष सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २०१३ अखेरचे कार्यकारी मंडळाने सादर केलेले ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.

३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१२-२०१३ च्या नफा विभागणीस मान्यता देणे.

४) सन २०१२-२०१३ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालास मंजूरी देणे.

५) सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासणीसाची नेमणूक करून मानधन ठरविणे.

६) सन २०१३-१४ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करुन मानधन ठरविणे.

७) सन २०१३-२०१४ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : २२/०७/२०१३


संचालक मंडळाच्या वतीने
श्री. बाळासाहेब विश्वास ताकवले
(सचिव)

विशेष सूचना

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजित सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.

३) सभेस येताना अहवालाची ही प्रत कृपया बरोबर आणावी.



अध्यक्षीय मनोगत...

सन्माननिय सभासद बंधू भगिनींनो,

आपल्या संस्थेची आज १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा. सभेस आपण ज्या आस्थेने, प्रेमाने आणि अगत्यपूर्वक उपस्थित राहिलात त्याबद्दल संचालक मंडळ व मी व्यक्तीशः आपले सहर्ष व सस्नेह स्वागत करतो. आर्थिक वर्ष २०१२-१३ मधील संस्थेच्या यशस्वी वाटचालीचा आलेख आपणासमोर सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

संस्थेने आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये **''रु.१०१ कोटीचा संमिश्र''** व्यवसायाचा टप्पा पार केला असुन हे सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार यांचा संस्थेवर असलेला निस्सीम विश्वासामुळे शक्य झाले. संस्थेच्या ठेवी रु.४९ कोटी च्या पुढे असुन कर्ज वाटप रु. ३६ कोटीच्या पुढे आहे. कर्जवसुलीतही त्याच धडाडीने काम करुन संस्थेने कर्ज वसुली ९८.४० % च्या पुढे केली आहे. संस्थेच्या नऊ शाखा व स्वमालकीचे प्रशासकीय कार्यालय असा विस्तार असून संस्था स्वभांडवलावर भक्कमपणे उभी आहे. संस्थेला चालु आर्थिक वर्षात आवश्यक असणाऱ्या सर्व तरतुदी केल्यानंतर रु.४७ लाख निव्वळ नफा झाला आहे, आणि हे सर्व आपणा सर्वाच्या सहकार्यामुळे शक्य झाले आहे.

भाग भांडवल व ठेवी प्रमाणेच कर्जाचे व्याज व मुद्दल वसुलीवर संस्थेचे भविष्य अवलंबुन असेत. त्या दृष्टीने संस्थेच्या सर्व कर्जदारांनी केलेले सहकार्य व व्यवस्थापनाने काटोकोरपणे केलेले कर्जवाटप याचा संयुक्त परिणाम म्हणजेच आपल्या संस्थेने मिळवलेल्या यशाचे घोतक आहे. ठेवीचे व्याजदर बाजारपेठेशी स्पर्धात्मक ठेवण्यांत आले व ठेव उभारणीच्या खर्चावर अतिरिक्त ताण येणार नाही याची ही काळजी घेण्यात आली आहे.

एक संघ सहकारी संचालक मंडळ, व्यवहारातील पारदर्शकता व आधुनिकतेची धरलेली कास यामुळेच संस्थेची नियोजन बध्द प्रगतीची वाटचाल सुरु आहे, इतर संस्थाशी तुलना करता आपल्या संस्थेची प्रगती चांगल्या प्रकारे होत असुन सहकारातील एक **''दिपस्तंभ''** म्हणून संस्थेकडे अभिमानाने पाहीले जाते.

संस्थेच्या प्रगतीमध्ये सातत्य टिकवुन ठेवण्यामध्ये संचालक मंडळातील माझे सहकारी, सेवकवर्ग, दैनंदिन ठेव प्रतिनिधी व सभासद याचे कृतीशील व कष्टपूर्ण योगदान निश्चितःच महत्वाचे आहे. आणि म्हणूनच त्यांचा मुद्दाम गौरवपुर्वक उल्लेख करतो. आपण सर्वांनी वेळोवेळी जो विश्वास दाखवला त्यामुळेच कामकाजामध्ये संख्यात्मक व गुणात्मक वाढ करु शकलो यातच उज्ज्वल सुवर्ण काळाची स्वप्ने सामावली आहे. आपली संस्था अशीच **''यशाची गौरव गाथा''** मोठ्या अभिमानाने सांगत मोठी होईल, असे अभिवचन देतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

आपला सहकारी

कृष्णा धुमाळ

(अध्यक्ष)

१६ वा वार्षिक कार्य अहवाल सन २०१२-२०१३

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा १६ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा - तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरून येईल.

संस्थेची वित्तीय स्थिती :-

(रू. लाखात)

तपशिल	३१/०३/२०१२ रु.	३१/०३/२०१३ रु.	वाढ रु.	टक्केवारी
भाग भांडवल	१७५.७९	१९७.७२	२१.९३	१२.४८
राखीव व इ. निधी	२२३.३२	२९८.४९	७५.१७	३३.६६
सभासद ठेवी	४००५.६७	४९३७.३६	९३१.६९	२३.२६
गुंतवणूक	१०४१.३८	१५५६.०८	५१४.७०	४९.४२
सभासद कर्जे	३१०७.२९	३६१६.२८	५०८.९९	१६.३८
खेळते भांडवल	४५१०.५९	५५६६.६६	१०५६.०७	२३.४१

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पूर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व निःस्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

सभासद :- ७३३८

गतवर्षी संस्थेचे ६४८३ सभासद होते, अहवाल वर्षात १०२१ नवीन सभासद झाले आणि १६६ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ७३३८ सभासद संख्या झाली आहे.

भाग भांडवल :- रु. १९७.७२ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये पाच कोटी असून गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. १,७५,७८,५००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. २१,९३,५००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१३ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. १,९७,७२,०००/- इतके आहे.

निधी :- रु. २९८.४९

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी व अन्य निधी उभारलेले आहेत.

अ) गंगाजळी (राखीव निधी) :-

गत वर्ष अखेरीस गंगाजळीमध्ये रु.५९,२५,४०८.०० जमा होते. अहवाल सालात जमा झालेली प्रवेश फी व सन २००८-०९ सालाचा लाभांश सभासदांनी घेऊन न गेल्यामुळे सहकार कायद्यानुसार तो गंगाजळी मध्ये वर्ग करण्यात आलेला असुन अहवाल वर्ष अखेरीस एकुण रु. ७१,२५,४२१.०० गंगाजळी जमा आहेत.

ब) इमारत निधी :-

गत वर्ष अखेरीस इमारत निधी मध्ये रु. १,०६,३७,९३१.०० जमा होते. अहवाल वर्षामध्ये रु. २१,७७,२८०.०० वाढ झाल्याने वर्ष अखेरीस रु. १,२८,१५,२११.०० इमारत निधीमध्ये जमा आहेत.

क) अन्य निधी :-

गत वर्ष अखेरीस अन्य निधी मध्ये रु. ५७,६८,६२३.०० जमा होते. अहवाल वर्षामध्ये रु.४१,३९,६०९.०० वाढ झाल्याने वर्ष अखेरीस रु.९९,०८,२३२.०० अन्य निधीमध्ये जमा आहेत.

ठेवी : रु. ४९३७.३६ लाख

संस्थेच्या कार्याचा मापदंड म्हणजे ठेवी. ठेवीदारांच्या विश्वासास पात्र राहुन ठेवीदारांसाठी विविध ठेवींच्या योजना राबवून संचालक, कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांच्या अथक परिश्रमातुन तळागाळातील खातेदारांकडुन ठेवी जमा करण्याचे काम केल्यानेच दिनांक ३१ मार्च २०१२ अखेर संस्थेच्या एकुण ठेवी रु. ४०,०५,६६,५७५/- होत्या त्यामध्ये रु.९,३१,६९,८४१/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१३ अखेर संस्थेच्या एकुण ठेवी रु. ४९,३७,३६,४१६/- झाल्या आहेत. ठेव वाढीचे प्रमाण २३.२६% इतके आहे.

गुंतवणुक : रु. १५५६.०८ लाख

संस्थने सभासदांना कर्ज वाटप करुनही काही रक्कम शिल्लक राहीली. ती रक्कम तशीच शिल्लक न ठेवता विविध बँकांमध्ये त्यांची गुंतवणुक करुन त्यापासुन व्याज मिळवुन उत्पन्न वाढीचा प्रयत्न केला आहे. सध्याच्या बँकींग क्षेत्रातील विविध बदलांमुळे गुंतवणुक ही आवश्यक बाब झाली आहे. कायदेशीर बाबींची पूर्तता म्हणुनही गुंतवणुकीस महत्व प्राप्त झाले आहे. म्हणुनच संस्थेने खालील तपशीलाप्रमाणे गुंतवणुक करुन त्यापासुन व्याज मिळवुन सुरक्षिततेची काळजी संचालकांनी घेतली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निर्धीच्या गुंतवणुकीबाबत घालुन दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन केलेले आहे.

दि. ३१ मार्च २०१२ अखेर संस्थेची गुंतवणुक रु. १०,४१,३८,००९/- एवढी होती. अहवाल वर्षात त्यात रु. ५,१४,७०,०७३/- ने वाढ होवुन दि. ३१ मार्च २०१३ अखेर संस्थेची एकुण गुंतवणुक रु. १५,५६,०८,०८२/- एवढी आहे या वाढीचे शेकडा प्रमाण ४९.४२% एवढे आहे.

रुपये लाखात

गुंतवणूक तपशील	रक्कम रुपये
दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. भाग	१,०००.००
महा.रा.सह.पत.फेड.लि. भाग	३,०००.००
राखीव निधी (रिझर्व फंड)	७१,३०,१३१.००
संशयित व बुडित कर्ज निधी	३७,६९,४१४.००
लाभांश समानिकरण निधी	३,३५,७८९.००
सभासद कल्याण निधी	१,०२,१९९.००
सेवक ग्रॅज्युईटी व कल्याण निधी	१,१७,४६२.००
धर्मादाय निधी	७९,०००.००
मुदत ठेव गुंतवणूक	१४,४०,७०,०८७.००
एकूण रु.	**१५,५६,०८,०८२.००**

कर्जे :- रु. ३,६१६.२८ लाख

वसुली हा संस्थेचा आत्मा आहे. कर्ज वाटप करणे सोपे आहे परंतु त्याच बरोबर वसुली यंत्रणा महत्वाची असते. वसुली शिवाय संस्थेची प्रगती होऊच शकत नाही. चांगले कर्जदार जपणे ही एक काळाची गरज आहे. त्याच प्रमाणे जे टाळाटाळ करतात त्यासाठी सुध्दा स्वतंत्र विभागा मार्फत वसुली करावी लागते. या एकाच नाण्याच्या दोन बाजु समजुन कर्ज वाटप करावे लागते. कर्जदाराची परत फेड, क्षमता, तारण, कारण या बाबींचा विचार करुनच संचालक मंडळ कर्ज मंजुर करते. कर्जदाराची आर्थिक गरज भागविणे व वसुलीची काळजी घेणे याबाबत संचालक मंडळ नेहमी क्रियाशील असते. संस्थेच्या विविध कर्ज योजना असुन सभासदांना माफक व्याजदराने कर्जपुरवठा करण्यात आला आहे.

दि. ३१ मार्च २०१२ अखेर संस्थेचे रु. ३१,०७,२८,८०७/- कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रु. २७,०३,३०,५३०/- एवढे नव्याने कर्ज वाटप केले असुन अहवाल सालात रु.२१,९४,३१,०२२/- एवढे कर्ज वसुल झालेले आहे. दि. ३१ मार्च २०१३ अखेरीस रु. ३६,१६,२८,३१५/- एवढी कर्ज येणेबाकी आहे.

कर्ज थकबाकी - प्रमाण १.६०%

संस्थाच्या थकबाकी संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सहकारखात्यातर्फे सांगितलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थांची थकबाकी ही ५ % पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. या बाबत आपल्या संस्थेने योग्य कारणासाठी तारण योग्य घेऊन उत्तम प्रकारे कर्ज वाटप केल्यामुळे थकबाकी मर्यादित ठेवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत. दि. ३१ मार्च २०१३ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे शेकडा प्रमाण १.६० % आहे. गतवर्षीच्या तुलनेत कर्ज थकबाकीचे शेकडा प्रमाण ०.११ % कमी झाले आहे

अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी :-

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न मिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता' (Non Performing Asset) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. ज्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना एन.पी.ए. ची वर्गवारी करण्याचे बंधन घातले. त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य पूणे यांचे आदेशानुसार दि. ३१ मार्च २००६ पासून पतसंस्थांना सुद्धा एन.पी.ए. निकष लागू केले व अनुत्पादक कर्जांची कालावधीनुसार तरतूद संस्थेच्या नफ्यातून करण्याचे बंधन घातले आहे.

आपल्या संस्थेचे दि.३१ मार्च २०१३ अखेर निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण २.३१% आहे. मा. सहकार आयुक्तांच्या परिपत्रकानुसार निव्वळ एनपीएचे प्रमाण हे १५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. सदर अनुत्पादीत कर्जांची संस्थेने १००% पेक्षा अधिक तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २०१३ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रू. लाखात)

अ.क्र.	कर्जाचे वर्गीकरण	येणे कर्ज रक्कम	प्रत्यक्ष तरतूद	N.P.A. साठी आवश्यक तरतूद
१.	**उत्पादित जिंदगी**	३४९०.९९	८.७५	---
२.	**अनुत्पादीत जिंदगी**			
	अ) सर्वसधारण जिंदगी	६९.३३	४२.६०	३.४७
	ब) संशयीत जिंदगी	५५.९६		१४.८५
	क) बुडीत जिंदगी	---	---	---
	एकूण	**३६१६.२८**	**५१.३५**	**१८.३२**

एन. पी. ए. साठी आवश्यक तरतुद रु.१८.३२ लाख असताना संस्थेने प्रत्यक्ष तरतूद रु.४२.६० लाख इतकी केली आहे. तसेच संस्थेने चालु आर्थिक वर्षात "उत्पादित जिंदगी" (Performing Asset) वर ऑडीट निकषाप्रमाणे (०.२५ % प्रमाणे) तरतूद रु. ८.७५ लाख इतकी केली असून संस्थेची स्थिती अधिकाधिक भक्कम केली आहे हे आपणास कळविण्यास आनंद वाटतो.

खेळते भांडवल :- रु. ५५६६.६६ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. ४५१०.५९ लाख एवढे होते. अहवालवर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल २३.४१% प्रमाणे रु. १०५६.०७ लाखाने वाढून रु. ५५६६.६६ लाख इतके झाले आहे.

संचालक मंडळ सभा :-

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १२ सभा होऊन एकूण २३२ ठराव पारीत करण्यात आले. मा. संचालक मंडळाने विविध समित्या नियुक्त केल्या असुन त्यापैकी कर्ज मंजुरी व वितरण समितीच्या एकूण २३ सभा, कर्जवसुली समिती एकूण ७ सभा आणि मा. संचालक मंडळ व विविध समितीच्या मिळुन एकूण ८४ सभा अवश्यकते नुसार घेण्यात आल्या.

कर्मचारी व संचालक प्रशिक्षण :-

अहवाल वर्षात संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे यांचे अंतर्गत ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड लि. कल्याण यांच्या मार्फत दि. २६/०८/२०१२ रोजी संस्थेचे सर्व संचालक, कर्मचारी दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांचेसाठी एक दिवसीय प्रशिक्षण सेंटोसा रिसार्ट पुणे येथे तसेच दि.१२, १३ व १४ जानेवारी २०१३ रोजी संस्थेचे सर्व संचालक व कर्मचारी यांचेसाठी तीन दिवसांचे प्रशिक्षण संस्थेचे प्रशासकीय कार्यालय नेरुळ, नवी मुंबई येथे आयोजित करुन नामांकित तज्ञां मार्फत ९७ वी घटना दुरुस्ती व त्यामधील तरतुदी, ठेव व्यवस्थापन, के. वाय. सी., कर्ज व्यवस्थापन, व्यक्तीमत्व विकास व वेळेचे व्यवस्थापन, मुद्रांक शुल्क, चलनक्षम दस्तऐवज कायदा, संस्था वाढीसाठी उपाययोजना व लेखापरिक्षण इ. विषयांवर प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यात आले. तसेच महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त प्रशिक्षण केंद्र मुंबई विभागीय सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई यांच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गात संस्थेचे अधिकारी यांना पाठविले.

नफा विभागणी :- रू. ४६.९४ लाख

अहवालसाली एकुण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतूदी वजा जाता रू. ४६,९४,०८१.०६ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रू.१०४.२२ मिळुन नफा रू.४६,९४,१८५.२८ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

तपशील	रक्कम रुपये
राखीव निधी (२५% प्रमाणे)	११,७३,५४६.००
लाभांश (८% प्रमाणे)	१४,०६,२८०.००
इमारत निधी	१७,००,०००.००
लाभांश समानिकरण निधी	१,००,०००.००
रौप्य महोत्सव निधी	६४,०००.००
सभासद कल्याण निधी	२,००,०००.००
कर्मचारी कल्याण निधी	५०,०००.००
पुढील वर्षासाठी शिल्लक नफा	३५९.२८
एकूण रु.	**४६,९४,१८५.२८**

लेखापरिक्षण :-

संस्थेचे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण श्री. बी. आर. सावंत (चार्टर्ड अकौंटंट) यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल गौरवोदगार काढले व संस्थेस "अ" वर्ग प्रदान केला. तसेच संस्थेचे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी श्री. व्ही. जी. शिंदे (चार्टर्ड अकौंटंट) यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. या बद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

उल्लेखनीय बाबी :-

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे :-

१) सभासदांसाठी 'पॅनकार्ड' सुविधा :-

संस्थेने आपल्या सभासद - खातेदार यांचेसाठी भारत सरकारच्या आयकर विभागामार्फत दिले जाणारे **'पॅनकार्ड'** 'पारिजात संस्थेमार्फत देण्याबाबत सामजस्य करार केला. त्यामुळे पारिजात संस्थेच्या सभासद ठेवीदारांना पॅनकार्ड आता संस्थेमार्फत देण्याची सुविधा करण्यात आली. अशा प्रकारे पॅनकार्ड सुविधा पतसंस्थेच्या माध्यमातून देणारी **'पारिजात'** ही एकमेव व प्रथम संस्था आहे.

२) वेस्टर्न युनियन मनी ट्रान्सफर एजन्सी (Western Union) :-

जगातील २०८ देशात राहणाऱ्या भारतीयांकडुन देशात पाठविण्यात येणाऱ्या पैशाचे विनिमय केंद्र पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी मध्ये करण्यात येत आहे. वेस्टर्न युनियन (Western Union) तर्फे नवी मुंबईतील पतसंस्थांमध्ये अशी सुविधा उपलब्ध होण्याचा मान सर्वप्रथम **''पारिजात''** संस्थेने मिळविला आहे.

३) महिला दिन व जेष्ठ नागरिक दिन :-

दि. ०८ मार्च २०१३ रोजी 'जागतीक महिला' दिनाचे औचित्य साधुन संस्थेच्या सर्व शाखामध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेच्या महिला कर्मचारी, महिला ठेव प्रतिनिधी तसेच महिला खातेदारांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानीत करण्यात आले. त्याच प्रमाणे दि. ०१ ऑक्टोंबर २०१२ रोजी **'जेष्ठ नागरीक दिन'** विभागीय स्तरावर साजरा करण्यात येऊन संस्थेच्या जेष्ठ खातेदार, सभासद यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

४) मोफत आरोग्य शिबीर :-

संस्थेच्या सिंहगड रोड शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त सभासद खातेदार ठेवीदार यांचेसाठी मोफत मधुमेह, रक्तगट व हिमोग्लोबीज तपासणी शिबीर व आरोग्य शिबीर अयोजित करुन संस्थेने सामाजिक बांधीलकी जपली आहे. या आरोग्य शिबीराचा १५५ व्यक्तीनी लाभ घेतला.

५) सर्वोत्तम शाखा पुरस्कार :-

संस्थेच्या कर्मचारी वर्गास प्रोत्साहीत करण्यासाठी उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या शाखेस व कर्मचाऱ्यांस सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात **''सर्वोत्तम शाखा''** पुरस्कार **''न्यु पनवेल''** शाखेस प्राप्त झाला आहे.

६) सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी पुरस्कार :-

मार्च २०१३ अखेर संस्थेकडे १०९ दैनंदिन ठेव प्रतिनिधी काम करीत आहेत. दैनदिन ठेव वसुलीत उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या दैनंदिन ठेव प्रतिनिधीस **''सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी''** म्हणुन सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात मुंबई व पुणे विभागातुन सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधीचा मान हडपसर शाखेचे ठेव प्रतिनिधी **श्री. प्रविण बबन तांबे** यांना प्राप्त झाला आहे.

आभार :-

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका तसेच संस्था कार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्याचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, महाराष्ट्र राज्य सह. बँक., ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., नवी मुंबई को-ऑप. बँक, कॉसमॉस को-ऑप. बँक, नॅशनल को-ऑप. बँक, अभ्युदय को-ऑप. बँक, महानगर को-ऑप. बँक, राजर्षी शाहु सहकारी बँक, दि. सातारा सहकारी बँक., अपना सह.बँक., कुर्ला ना. सह. बँक, पंजाब नॅशनल बँक, सारस्वत को-ऑप बँक, कल्याण जनता सह बँक लि, संत सोपानकाका ना. सह. बँक, पंजाब आणि महाराष्ट्र को-ऑप. बँक यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक श्री. बी. आर. सावंत (चार्टर्ड अकौंटट), अतंर्गत लेखापरिक्षक श्री. व्ही,जी,शिंदे,(चार्टर्ड अकौंटट) संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टम्स, तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै. ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करु शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मनःपुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

श्रद्धांजली :-

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत, शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झाले आहेत त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

आपला सहकारी

कृष्णा पां. धुमाळ

अध्यक्ष



दि. ३१ मार्च २०१३

सन २०११-१२ रु. पैसे	भांडवल व देणी		सन २०१२-१३ रु. पैसे
५,००,००,०००.००	**अधिकृत भाग भांडवल :**		५,००,००,०००.००
१,७५,७८,५००.००	**वसूल भाग भांडवल :**		१,९७,७२,०००.००
	राखीव निधी व इतर निधी :		
५९,२५,४०८.००	राखीव निधी	७१,२५,४२१.००	
१,०६,३७,९३१.००	इमारत निधी	१,२८,१५,२११.००	
३५,१०,०००.००	संशयित बुडीत कर्ज निधी	४२,६०,०००.००	
५३,९९९.००	धर्मादाय निधी	५३,९९९.००	
२,३५,०००.००	लाभांश समानिकरण निधी	३,३५,०००.००	
६०,११२.००	सभासद कल्याण निधी	७९,०४६.००	
६७,०००.००	सेवक कल्याण निधी	१,१७,०००.००	
२,४५,५१२.००	सहकार प्रशिक्षण निधी	६,२८,१८७.००	
६,४२,०००.००	आकस्मिक निधी	१७,४२,०००.००	
१,६५,०००.००	गुंतवणुक चढउतार निधी	१,६५,०००.००	
४०,०००.००	रौप्यमहोत्सव निधी	२,९०,०००.००	
७,५०,०००.००	उत्पादित कर्जावरील संभाव्य तरतूद	८,७५,०००.००	
००.००	माहिती तंत्रज्ञान निधी	१०,६३,०००.००	
००.००	निवडणुक निधी	३,००,०००.००	२,९८,४८,८६४.००
	सभासद ठेवी :		
३,५५,९९,४७१.२६	बचत ठेव	३,३४,६२,४५६.०५	
९,७०,९७,२१०.००	दैनंदिन बचत ठेव	११,५४,१८,९८८.००	
२९,५१,८८२.००	सभासद ठेव	२९,३५,२४१.००	
४,५१,७८,६५५.००	अल्प मुदत ठेव	६,९६,२७,६०१.००	
४,४४,६१,६५५.००	मुदत ठेव	३,७२,२२,४६६.००	
१,९७,१८,७०५.००	दामदुप्पट ठेव	२,०७,४२,७१८.००	
३,५९,२९९.००	पारिजात बक्षीस ठेव	२,०५,७९९.००	
३,३४,४८,४२५.००	मासिक प्राप्ती ठेव	३,९१,७३,८५०.००	
३३,३२,८७१.००	आवर्त ठेव	३०,४२,०६०.००	
४,५१,२२,९५५.००	शुभकार्य ठेव	४,५९,१०,७६७.००	
१०,०००.००	धनवृद्धी ठेव	००.००	
४९,७०,०००.००	धन लक्ष्मी ठेव	९८,०००.००	
७७,७९,८०९.००	शुभ लक्ष्मी ठेव	१,६९,४४,०१८.००	
४,४३,७८,७०२.००	धनवर्षा ठेव	४,६२,४८,५६०.००	
१,६१,५६,९३६.००	पारिजात ठेव	४,५३,७८,०४५.००	
००.००	वैभवलक्ष्मी ठेव	१,७३,२५,८४७.००	४९,३७,३६,४१६.०५
४४,०४,७७,०३७.२६	पुढील पानवर.....		५४,३३,५७,२८०.०५

रोजीचे ताळेबंदपत्रक

सन २०११-१२ रु. पैसे	मालमत्ता व येणी		सन २०१२-१३ रु. पैसे
	रोख व बँक शिल्लक :		
१७,२९,८२८.४८	रोख शिल्लक	४,८४,६८९.५५	
२,९१,७९५.७४	कॉसमॉस को-ऑप. बँक लि.	१४,५६,७३४.०६	
८,२३७.३६	महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.	११,९१०.३०	
३४,८५०.००	दि. ठाणे जि.म.सह.बँक	२८,९६३.००	
२,०८,५३९.००	नवी मुंबई को-ऑप.बँक	९,४५,७३०.००	
६,१४,१६३.३३	अभ्युदय को-.ऑप.बँक	२९,३३,७५०.०१	
१,०५,८१४.४५	नॅशनल को-ऑप.बँक	१२,०३,३८१.४५	
५,७७४.००	राजश्री शाहू सह. बँक लि.-पुणे	३,९०,७७४.००	
१३,६८३.०३	सातारा सहकारी बँक लि.	९,०६६.००	
११,८५२.००	महानगर को-ऑप. बँक लि.	९,५४,६६५.००	
००.००	पंजाब नॅशनल बँक लि.	४,९००.००	
००.००	कल्याण जनता सहकारी बँक लि.	५,३२,५८३.६२	
००.००	अपना सहकारी बँक	४३,४१९.४०	९०,००,५६६.३९
	गुंतवणूक :		
१,०००.००	ठाणे जि.मध्य.सह.बँक-भाग	१,०००.००	
३,०००.००	महा.रा.सह.पत.फेडरेशन-भाग	३,०००.००	
५९,७०,९५८.००	ठाणे जि.म.सह.बँक-राखीव व इतर निधी	७५,८२,९५८.००	
३७,३७,९४२.००	महाराष्ट्र रा. सह. बँक-राखीव व इतर निधी	३९,५१,०३७.००	
७१,४५,४५९.००	नवी मुंबई को-ऑप.बँक-मुदत व आर्वत ठेव	२,९७,५९,४२६.००	
६,००,०००.००	नॅशनल को-ऑप बँक लि.-मुदत ठेव	७१,००,०००.००	
२,१९,००,०००.००	कॉसमॉस को-ऑप बँक - मुदत ठेव	२०,००,०००.००	
३,६०,५७,५००.००	अभ्युदय को-ऑप बँक-मुदत व आवर्त ठेव	५००,०७,५००.००	
१०,००,०००.००	सारस्वत को-ऑप बँक-मुदत ठेव	१,३०,००,०००.००	
१,१३,२२,१५०.००	अपना सहकारी बँक लि.-मुदत व आर्वत	१,४२,०३,१६१.००	
६०,००,०००.००	कुर्ला नागरिक सहकारी बँक लि.-मुदत ठेव	५०,००,०००.००	
३४,००,०००.००	महानगर को-ऑप. बँक लि.-मुदत ठेव	९३,००,०००.००	
००.००	सातारा सहकारी बँक लि.-मुदत ठेव	२५,००,०००.००	
००.००	पंजाब आणि महाराष्ट्र को. ऑप.-मुदत ठेव	४०,००,०००.००	
००.००	संत सोपानकाका सह बँक -मुदत ठेव	५०,००,०००.००	
००.००	कल्याण जनता सह बँक -मुदत ठेव	२२,००,०००.००	
२५,००,०००.००	ठाणे जि. मध्य. सह. बँक-मुदत ठेव	००.००	
१०,००,०००.००	महाराष्ट्र राज्य सह बँक. लि.-मुदत ठेव	००.००	
३५,००,०००.००	डि.एम.के. जावली बँक-मुदत ठेव	००.००	१५,५६,०८,०८२.००
	सभासद कर्ज		
२,११,०२,४०५.००	वैयक्तिक / जामिनकी कर्ज	१,९९,९५,३९३.००	
८५,७२,९९१.००	वाहन तारण कर्ज	७०,४०,०२९.००	
२२,५६,९७,२४७.००	सुरक्षित तारण कर्ज	२६,२८,१९,९७६.००	
३४,३४,१८९.००	इतर तारण कर्ज	३३,५८,९२१.००	
३६,५९,६९,३७८.३६	पुढील पानवर.....		१६,४६,०८,६४८.३९

दि. ३१ मार्च २०१३

सन २०११-१२ रु. पैसे	भांडवल व देणी		सन २०१२-१३ रु. पैसे
४४,०४,७७,०३७.२६	मागील पानवरुन.....		५४,३३,५७,२८०.०५
	इतर देणी :		
१९,०१,२२१.००	ठेवीवरील देय व्याज	२१,२५,५२८.००	
१०,५०,७०८.००	लाभांश देणे	१५,११,२७९.००	
५०,०००.००	सिक्युरिटी डिपॉझीट	१,००,०००.००	
४७.८८४.००	अधिभार (सरचार्ज) देणे	५३.०७४.००	
५५०.००	शेअर्स अनामत खाते	१,६५०.००	
१८,०००.००	रिटेंशन मनी	००.००	३७,९१,५३१.००
	इतर देणी : तरतूदी :		
९,०५०.००	व्यवसाय कर	९,६००.००	
७३,३२८.००	आय कर टि.डी.एस.	८७,५९९.००	
६३,२८५.००	सेवक भविष्य निर्वाह निधी	६९,८३०.००	
३,३७,५००.००	लेखापरिक्षण फी	४,२१,७०१.००	
५,०००.००	शिक्षण निधी	५,०००.००	
५,२२५.००	कर्मचारी विमा हप्ता	६,१६६.००	
१०,३५०.००	टेलिफोन बिल	१२,५००.००	
२५,०००.००	विज बिल	३९,०००.००	
६,०००.००	व्यवसायिक फी	४९,०००.००	
४१,५१९.००	इतर देणी	४२,३७३.००	
००.००	आयकर तरतूद	८०,०००.००	८,२२,७६९.००
३३,०२,०००.००	थकीत व्याज निधी तरतूद :		४०,००,०००.००
	नफा तोटा खाते :		
३२०.८५	मागील वर्षाचा शिल्लक नफा	१०४.२२	
३६,३४,६२३.३७	अधिक : चालू वर्षाचा नफा	४६,९४,०८१.०६	४६,९४,१८५.२८
४५,१०,५८,६०१.४८	एकुण		५५,६६,६५,७६५.३३

मे. बी. आर सावंत ॲण्ड कं.	मे. व्ही. जी. शिंदे ॲण्ड कं.	श्री. तानाजी गु. शिंदे
चार्टर्ड अकौंटंट - वैधानिक लेखापरिक्षक	चार्टर्ड अकौंटंट - अंतर्गत लेखापरिक्षक	व्यवस्थापक

रोजीचे ताळेबंदपत्रक

सन २०११-१२ रु. पैसे	मालमत्ता व येणी		सन २०१२-१३ रु. पैसे
३६,५९,६९,३७८.३६	**मागील पानवरुन.....**		१६,४६,०८,६४८.३९
	सभासद कर्जे :		
१५,१६,६९३.००	शासकीय रोखे कर्ज	७,८६,१४२.००	
८९,३१,८२४.००	दावा दाखल कर्ज	६९,३१६३०.००	
१६,५९,३९१.००	कर्मचारी वैयक्तिक कर्ज	१८,७१,४८८.००	
१,७९,२६१.००	कर्मचारी वाहन तारण कर्ज	१,८९,०४१.००	
४०,७६,१२४.००	कर्मचारी घरतारण कर्ज	३७,७३,३४४.००	
२३,०८,८३०.००	दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज	२६,३६,३०६.००	
२,८८,६३,५६८.००	ठेव तारण कर्ज	४,५१,४५,५४९.००	
४३,८६,२८४.००	सोने तारण कर्ज	७०,८०,४९६.००	३६,१६,२८,३१५.००
	मालमत्ता :		
४४,६६,९६१.००	फर्निचर व फिक्चर्स खाते	३९,३८,४४१.००	
७,१५,९४२.००	संगणक खाते	५,९८,२०३.००	
१,९४,५३०.००	वातानुकूलीत यंत्रे खाते	१,४५,८९५.००	
४,१८,५५७.००	इलेक्ट्रॉक साधन सामुग्री खाते	३,७६,७०१.००	
२,४०,४३४.००	कार्यालय साधन सामुग्री खाते	२,०४,३६८.००	
१,०४,४९,४७६.००	इमारत खाते	१,०१,२७,००२.००	
५५,६५१.००	डेली कलेक्शन मशीन	४४,९५६.००	
८,३१५.००	ग्रंथालय खाते	७,४८३.००	
५१,९५२.००	इनव्हर्टर खाते	३६,३६६.००	
७,२१८.००	मोबाईल फोन खाते	५,०५३.००	१,५४,८४,४६८.००
	येणे व्याज :		
३३,००,९९९.००	सभासद कर्जावरील येणे व्याज	३९,८५,४०५.००	
१,१२,६१,६४२.००	गुंतवणूकीवरील येणे व्याज	९१,७६,७८५.००	१,३१,६२,१९०.००
	इतर येणी :		
९,६५,०००.००	कार्यालय अनामत	९,२०,०००.००	
१२,५५०.००	दूरध्वनी सुरक्षा ठेव	१२,५५०.००	
४२,२६०.००	वीज सुरक्षा ठेव	४२,२६०.००	
३,५००.००	पाणी कनेक्शन ठेव	३,५००.००	
५,०००.००	बि.ई.एस.टी/सुरक्षा ठेव	५,०००.००	
३,३५,१६६.६६	स्टेशनरी स्टॉक	२,८९,६२८.९६	
३,६००.००	मुद्रांक साठा	४,६००.००	
४९,७८३.००	आगाऊ विमा	५३,६७५.००	
१०,५२७.००	पॅनकार्ड कुपन्स स्टॉक	३,२७१.००	
२५,०००.००	आयकर (२०१०-२०११)	२५,०००.००	
५०,०००.००	आयकर (२०११-२०१२)	८५,८७६.००	
००.००	आयकर (२०१२-२०१३)	४०,०००.००	
२,४२,३७६.००	कार्यालय नुतनीकरण खर्च	१,८७,७४१.००	
५७,८७२.००	अगाऊ खर्च	३६,०१७.००	
२२,३७३.४३	टी.डी.एस व इतर येणी	२२,७२४.९८	
३७,९१३.००	प्राथमीक खर्च (शाखा उद्घाटन)	००.००	१७,३१,८४३.९४
	ॲडव्हान्स :		
१,३२,६५०.००	दै. ठेव प्रतिनिधी मशीन ॲडव्हान्स		५०,३००.००
४५,१०,५८,६०१.४८	**एकुण**		५५,६६,६५,७६५.३३

श्री. दिपक शं. टेळे
खजिनदार

श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव

श्री. कृष्णा पां. धुमाळ
अध्यक्ष

दि. ३१ मार्च २०१३

सन २०११-१२ रु. पैसे	खर्च	सन २०१२-१३ रु. पैसे
२,५६,१७,५७४.००	सभासद ठेवीवरील व्याज	३,१५,१२,८९९.००
९,३८,३४१.००	अधिकर्ष व्याज खर्च	९,२५,८४०.००
७४,३६,५७९.००	कर्मचारी पगार, बोनस व भत्ते	७२,८६,९३३.००
३,९०,४४८.००	कर्मचारी भ.निर्वाह निधी संस्था अंशदान	४,२९,७३२.००
१,४८,२८०.००	कर्मचारी ग्रुप ग्रॅज्युईटी (एल.आय.सी.) खर्च	१,०४,५२४.००
७८,२३,६८७.००	दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन	९७,८१,३६७.००
७,८०,२३६.००	कार्यालय भाडे	८,५१,७२२.००
३,१०,३८७.८४	स्टेशनरी व दिनदर्शिका छपाई खर्च	४,८०,५२५.२०
४६,२००.००	वार्षिक अहवाल छपाई खर्च	६२,७९०.००
१,४१,८३०.००	किरकोळ खर्च	१,९७,६५८.००
४,२४,६३७.००	वीज खर्च	५,२९,७०३.००
१,६२,६०८.००	टेलिफोन खर्च	१,४८,०२५.००
१,९९,०४८.००	प्रवास खर्च	२,२४,४७७.००
७४,९३४.००	विमा खर्च	८०,५६०.००
१४,२४१.००	टपाल खर्च	८,४६९.००
२,०९,३६४.००	कार्यालय दुरुस्ती व देखभाल खर्च	१,५७,३९८.००
७,१५१.००	कार्यालय पाणी बिल खर्च	७,१७५.००
६९,७३८.००	संगणक दुरुस्ती व देखभाल खर्च	३१,१४०.००
३,०९,२७४.००	संगणक दुरुस्ती व देखभाल खर्च (AMC)	३,१४,८४०.००
२,०००.००	कार्यालय साफसफाई (AMC)	७,६००.००
२०,२५१.००	वातानुकूलीत यंत्रे (AMC)	२६,४००.००
३९,०६५.००	कार्यालय देखभाल व मालमत्ता कर खर्च	२५,९०९.००
८०,८८८.००	कार्यालय साफसाफाई खर्च	८४,९४५.५०
३,६८,११५.००	लेखापरिक्षण फी (शासकीय / अंतर्गत)	४,००,०००.००
२७,२२८.००	व्यावसायिक व कायदे विषयक सल्लागार फी	५२,४१८.००
२,५००.००	व्यवसाय कर खर्च संस्था	२,५००.००
२,०००.००	सभासदत्व व वर्गणी	३,०००.००
२९,४२५.००	दिपावली भेट खर्च	१३,३४०.००
१,००,५४७.००	पुजा खर्च	९९,९७६.००
२६,९७२.६३	बँक चार्जेस खर्च	५६,८३७.८६
११,८००.००	सर्विस टॅक्स	३९,४५५.००
४,५८,१५,३४९.४७	पुढील पानवर.....	५,३९,४८,१५८.५३

अखेरचे नफा-तोटा पत्रक

सन २०११-१२ रु. पैसे	उत्पन्न	सन २०१२-१३ रु. पैसे
४,२४,५४,२९१.००	सभासद कर्जावरील व्याज	५,०४,९५,६१०.००
८९,६२,५५१.७५	गुंतवणूकीवरील व्याज	१,२७,६२,८८१.४०
६,८९,२९४.००	कर्ज प्रोसेसिंग चार्जेस	८,८७,५९८.००
२,३९,५६१.००	कर्ज वसुली चार्जेस जमा	२,०५,१६१.००
३६,६०१.००	फॉर्म फी, सर्व्हिस चार्जेस इ.	५२,१८०.००
१५०.००	लाभांश	१५०.००
८,१३,२४८.०९	इतर जमा	६,२३,९७९.३०
५,३१,९५,६९६.८४	पुढील पानवर.....	६,५०,२७,५५९.७०

दि. ३१ मार्च २०१३

सन २०११-१२ रु. पैसे	खर्च	सन २०१२-१३ रु. पैसे
४,५८,१५,३४९.४७	मागील पानवरुन.....	५,३९,४८,१५८.५६
२९,६४०.००	कर व परवाना फी	४६,६५०.००
८१,४०५.००	वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च	९८,९५०.००
६१,४०५.००	प्राथमिक खर्च निर्लेखित	३७,९१३.००
१,०२,४५०.००	संचालक सभा भत्ता खर्च	१,२१,८००.००
२,०००.००	सॉप्टवेअर डेव्हलपमेंट चार्जेस	३,३७५.००
७१,७८७.००	भेट व तपासणी खर्च	७७,६९१.००
४,६६५.००	लॉकर भाडे	८,६३०.०८
१,४७,५५७.००	कर्ज वसुली खर्च	६५,२९६.००
५१,९०१.००	जाहिरात खर्च	१५,०११.००
१,५८,८३२.००	सिक्युरिटी गार्ड खर्च	१,७६,५१६.००
२१,७०३.००	मालमत्ता विक्रीतील तुट खर्च	१,१३,३६१.००
३०,७९९.००	कार्यालय नुतनीकरन निर्लेखन खर्च	५४,६३५.००
१२,०००.००	ब्रोकरेज खर्च	००.००
२,३४,७०१.००	मालमत्ता निर्लेखन खर्च	००.००
५,०००.००	शिक्षण निधी तरतूद	५,०००.००
१,२०,०००.००	उत्पादित कर्ज संभाव्य तरतूद	१,२५,०००.००
२,५०,०००.००	संशयित व बुडित कर्ज निधी तरतूद	५,००,०००.००
७,०२,०००.००	थकित व्याज निधी तरतूद	६,९८,०००.००
२,००,०००.००	आकस्मिक देणी तरतुद	१०,००,०००.००
२,००,०००.००	सहकार प्रशिक्षण निधी तरतूद	५,००,०००.००
००.००	निवडणुक निधी तरतुद	३,००,०००.००
००.००	रौप्य महोत्सवी निधी तरतुद	२,००,०००.००
००.००	आयकर तरतुद	८०,०००.००
००.००	माहिती आणि तंत्रज्ञान निधी तरतुद	१०,००,०००.००
१२,५७,८७९.००	घसारा	११,५७,४९२.००
३६,३४,६२३.३७	निव्वळ नफा ताळेबंद वर्ग	४६,९४,०८१.०६
५,३१,९५,६९६.८४	एकुण	६,५०,२७,५५९.७०

मे. बी. आर सावंत ॲण्ड कं.
चार्टर्ड अकौंटंट - वैधानिक लेखापरिक्षक

मे. व्ही. जी. शिंदे ॲण्ड कं.
चार्टर्ड अकौंटंट - अंतर्गत लेखापरिक्षक

श्री. तानाजी गु. शिंदे
व्यवस्थापक

अखेरचे नफा-तोटा पत्रक

सन २०११-१२ रु. पैसे	उत्पन्न	सन २०१२-१३ रु. पैसे
५,३१,९५,६९६.८४	मागील पानवरुन.....	६,५०,२७,५५९.७०
५,३१,९५,६९६.८४	एकुण	६,५०,२७,५५९.७०

श्री. दिपक शं. टेळे
खजिनदार

श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव

श्री. कृष्णा पां. धुमाळ
अध्यक्ष

वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल : (सन २०१२-२०१३)

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम ६९ अन्वये दयावयचा)

आम्ही पारिजात को-ऑप क्रेडिट सोसायटी मर्यादित, नवी मुंबई या संस्थेच्या दिनांक ३१ मार्च २०१३ रोजीचे ताळेबंद पत्रक आणि त्याच दिवशी संपलेल्या वर्षाचे नफा तोटा पत्रकाचे वैधानिक लेखा परिक्षण करुन सोबत जोडलेली आहेत. हि हिशोबी पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. या आर्थिक पत्रकाचे लेखापरिक्षण करुन त्यावर मत प्रदर्शित करण्याची आमची जबाबदारी आहे.

साधारणतः भारतामध्ये स्विकृत झालेल्या लेखापरिक्षण मान्यतानूसार आम्ही संस्थेचे लेखापरिक्षण केलेले आहे. या लेखापरिक्षण मान्यतानूसार आम्ही लेखापरीक्षण कार्यक्रम आखून व त्याप्रमाणे काम करुन विश्वासपूर्वक असे पाहिले आहे की, सदर आर्थिक पत्रकांत कोणतेही महत्वाचे दोष राहू नयेत. लेखापरिक्षणात चाचणी तपासणी तसेच आर्थिक पत्रकांतील रक्कमांच्या संदर्भात कागदपत्रे तपासून या रक्कमा पत्रकांत योग्यरित्या दाखविलेल्या असल्याबद्दलची खात्री करणे, त्याचप्रमाणे मान्यता प्राप्त लेखांकन सिध्दांताप्रमाणे आर्थिक पत्रकांचे मुल्याकंन, अनुमान आणि तसेच ही आर्थिक पत्रके संस्थेच्या व्यवस्थापनाने महत्वपुर्ण अनुमानाप्रमाणे प्रस्तुत केल्याबदलचे मुल्यांकन या लेखापरिक्षणात समाविष्ट आहे. त्यामुळे आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाप्रमाणे वाजवीरित्या मत प्रदर्शित करण्यबद्दल आम्हाला खात्री आहे. त्याप्रमाणे आभिप्राय देतो की :-

१. आमच्या लेखापरिक्षणाच्या संदर्भात, आमच्या ज्ञानाप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे, आम्ही संस्थेकडुन मागितलेली सर्व माहिती व स्पष्टीकरण आम्हाला समाधानकार वाटली.

२. संस्थेच्या ताळेबंद आणि नफा पत्रके हि महाराष्ट्र सहकारी सोसायट्यांच्या कायदा व त्या खालील नियमानुसार तयार केलेली आहेत.

३. संस्थेची ताळेबंद पत्रके व नफा तोटा पत्रके हि संस्थेच्या हिशोबी पुस्तके व विवरणे या बरोबर मिळती जुळती आहेत.

४. आमच्या मते आम्हास दिलेल्या माहिती व स्पष्टिकरणानूसार त्याच प्रमाणे या आर्थिक पत्रकावर दिलेल्या स्वतंत्र टिपणीनुसार, प्रतिवृत्तांवरील विभाग 'अ' 'ब' 'क' मधील शेऱ्यास पात्र राहून तसेच भारतामध्ये साधारणतः स्विकृत असलेल्या लेखापरिक्षण मान्यतानुसार :

अ) ताळेबंद पत्रक सोसायटीची दि. ३१ मार्च २०१३ ची खरी व योग्य स्थिती दाखवत आहे आणि

ब) नफा तोटा पत्रक दि. ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षाच्या खरा व योग्य नफा दर्शविते.

५. सन २०१२-१३ सालाकरिता संस्थेस लेखापरिक्षण वर्ग **'अ'** देण्यात आला आहे.

स्थळ : वाशी, नवी मुंबई
दिनांक : १३-०७-२०१३

मे. बी. आर. सावंत ॲण्ड कं.
चार्टर्ड अकौटंट
सही
(बी. आर. सावंत)
प्रोप्रायटर

अंदाज पत्रक सन २०१३-२०१४

(रू. लाखात)

उत्पन्न तपशिल	अंदाजे उत्पन्न २०१२-१३	प्रत्यक्ष उत्पन्न २०१२-१३	अंदाजे उत्पन्न २०१३-१४
सभासद कर्जावरील व्याज	५१४.९२	५०४.९६	६११.५०
गुंतवणुकी वरील व्याज व लाभांश	११०.२४	१२७.६३	१५६.९८
इतर उत्पन्न	१८.५१	१७.६९	१८.३४
एकूण रू.	६४३.६७	६५०.२८	७८६.८२

खर्च तपशिल	अंदाजे खर्च २०१२-१३	प्रत्यक्ष खर्च २०१२-१३	अंदाजे खर्च २०१३-१४
सभासद ठेवीवरील व्याज	३२८.५५	३१५.१३	४०१.३७
कर्मचारी पगार, बोनस, भ.निर्वाह निधी व ग्रज्युईटी खर्च	८५.००	७८.२१	१०५.४०
दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन*	८९.००	९७.८१	११३.००
छपाई व स्टेशनरी, अहवाल व कॅलेंडर छपाई खर्च*	५.३५	५.४३	७.५०
वार्षिक सभा व संचालक सभा भत्ता खर्च	२.५०	२.२१	३.००
प्रवास व किरकोळ, दिवाळी भेट,गणवेश, व्हिजीट खर्च	७.६५	५.१४	९.१०
विमा व पोस्टेज खर्च	१.३५	०.८९	१.७५
विज, फोन, पाणी, मालमत्ता कर, कार्यालय भाडे, सर्विस टॅक्स, लायसन्स फी व मेंटेनन्स चार्जेस	१७.१५	१६.४९	१९.८१
देखभाल व दुरुस्ती, पुजा, उद्घाटन, पुजा व साफसफाई खर्च व सिक्युरिटी गार्ड खर्च	९.७५	६.१२	१०.५०
ऑडिट फी खर्च *	३.९०	४.००	५.५०
AMC वर्गणी, व्यवसाय कर कायदेशीर फी व ब्रोकरेज	५.७५ ५७	४.०७	६.१५
ओव्हर ड्राप्ट कर्ज व्याज, बँक चार्जेस व लॉकर भाडे *	९.३०	९.९१	१०.१९
कर्ज वसुली व जाहिरात खर्च	३.२०	०.८०	४.५०
घसारा खर्च	१३.५०	११.५७	११.००
तरतुदी (शिक्षण निधी, बुडीत कर्ज निधी व थकित व्याज निधी, उत्पादित कर्ज सभाव्य तरतूद, सहकार प्रशिक्षण निधी तरतूद, आकस्मिक निधी तरतूद) *	१७.००	४३.२८	२१.०५
अन्य खर्च (सॉफ्ट. डेव्ह., संगणक दुरुस्ती, मालमत्ता निर्लेखन, मालमत्ता विक्रीतील तूट खर्च)	३.७५	२.२८	४.५०
नफा	४१.१५	४६.९४	५२.५०
एकुण रु.	६४३.६७	६५०.२८	७८६.८२

* अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मा. संचालक मंडळाने मासिक सभेत मंजुरी दिली असुन वार्षिक सभेत सदर खर्चास मंजुरीसाठी शिफारस करत आहे.

संचालक कर्जाचा तपशील :-

३१-०३-२०१३ अखेर येणे कर्ज	३१-०३-२०१३ अखेर थकबाकी	थकबाकीचे प्रमाण
४६,०९,२६०.००	००.००	००%

संचालक नातेवाईक कर्जाचा तपशील :-

३१-०३-२०१३ अखेर येणे कर्ज	३१-०३-२०१३ अखेर थकबाकी	थकबाकीचे प्रमाण
४७,२९,९७५.००	००.००	००%

संस्थेचे गत पाच वर्षातील आर्थिक प्रगती

सन	२००८-२००९	२००९-२०१०	२०१०-२०११	२०११-२०१२	२०१२-२०१३
भाग भांडवल	१,२१,१२,४००	१,३५,७९,९००	१,५४,८८,८००	१,७५,७८,५००	१,९७,७२,०००
गुंतवणूक	५,२०,७१,५८०	७,२८,२६,२२७	९,०२,६२,०९४	१०,४१,३८,००९	१५,५६,०८,०८२
ठेवी	२४,०८,१६,१६३	२९,२४,१६,८२७	३४,९७,६८,८३३	४०,०५,६६,५७५	४९,३७,३६,४१६
कर्जे	१८,२३,७६,४२०	२१,६२,२१,६६७	२६,३१,३४,३७८	३१,०७,२८,८०७	३६,१६,२८,३१५
खेळते भांडवल	२६,९४,७४,६६५	३२,६५,३४,६५८	३९,२१,५१,७१२	४५,१०,५८,६०१	५५,६६,६५,७६५

सभासदांना सूचना :-

- सभासदाने आपला पत्ता बदलल्यास नवीन पत्त्याविषयी कार्यालयास लेखी सूचना त्वरीत करावी.
- ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी अपले वारस नेमून घ्यावेत.
- सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज शाखेत जमा करावेत.
- पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- प्रत्येक महिन्याच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आर. डी. या बाबतचे पासबुकावर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी.
- संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.

परिशिष्ट - 'अ'

संस्थेचे नांव	:	**पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई**
मुख्य कार्यालय	:	पारिजात भवन, प्लॉट नं.१५, सेक्टर-१० ए, नेरुळ नवी मुंबई - ४०० ७०६
नोंदणी क्रमांक	:	टी.एन.ए./(टी.एन.ए.)/आर.एस्.आर./(सी.आर.)/९५१-सन १९९७
कार्यक्षेत्र	:	बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा
शाखा	:	नऊ (प्रशासकीय कार्यालय व्यतिरिक्त नऊ शाखा)
सभासद संख्या	:	७३३८
अधिकृत भाग भांडवल	:	रु. ५,००,००,०००.००
वसुल भाग भांडवल	:	रु. १,९७,७२,०००.००
राखीव व इतर निधी	:	रु. २,९८,४८,८६४.००
ठेवी	:	रु. ४९,३७,३६,४१६.००
कर्जे	:	रु. ३६,१६,२८,३१५.००
बाहेरील कर्जे	:	नाही
गुंतवणूक	:	रु. १५,५६,०८,०८२.००
लेखापरिक्षण वर्ग	:	"अ"
अहवाल सालातील नफा	:	रु. ४६,९४,१८५.२८
कर्मचारी वर्ग	:	५३
खेळते भांडवल	:	रु. ५५,६६,६५,७६५.३३

विविध ठेव योजना :-

'नातवा' पासून 'आजोबा' पर्यंत..... कुटुंबातील सर्वांसाठी

• मुदत ठेवीवरील व्याज दर •

कालावधी	व्याजदर
३० ते ४५ दिवस	७.५० %
४६ ते ९० दिवस	८.५० %
९१ ते १८० दिवस	९.०० %
१८१ ते ३६४ दिवस	९.५० %

कालावधी	व्याजदर
१ वर्ष ते २ वर्षा पेक्षा कमी	१०.५० %
२ वर्ष ते ३ वर्षा पेक्षा कमी	११.०० %
३ वर्ष ते ४ वर्षा पेक्षा कमी	११.२५ %
४ वर्ष व अधिक	११.०० %

* मुदत व मासिक प्राप्ती ठेवीवर एक वर्षे व त्यापेक्षा आधिक मुदतीसाठी जेष्ठ नागरिक/अपंग/विधवा यांना ½ % अधिक व्याज

• मासिक प्राप्ती योजना •

मुदत वर्षे	ठेव रक्कम (सर्वसाधारण)	ठेव रक्कम (ज्येष्ठ नागरिक/अपंग/विधवा)	दरमहा मिळणारी रक्कम
१ वर्षे ते २ वर्षपिक्षा कमी	रु. १,१४,३००/-	रु. १,०९,१००/-	रु. १,०००/-
२ वर्षे ते ३ वर्षपिक्षा कमी	रु.१,०९,१००/-	रु.१,०४,३५०/-	रु.१,०००/-
३ वर्षे ते ४ वर्षपिक्षा कमी	रु. १,०६,७००/-	रु. १,०२,१५०/-	रु. १,०००/-

शुभकार्य ठेव योजना

दरमहा	भरा	मिळवा
रु. ६००/-	फक्त ६६ महिने	रु. ५०,०००/-
रु. १२००/-		रु. १,००,०००/-

• आवर्त ठेव योजना •

कालावधी	व्याजदर	कालावधी	व्याजदर
१२ माहिने	१०.०० %	३६ माहिने	१०.५० %
२४ महिने	१०.२५ %	४८ महिने	११.०० %

• शुभलक्ष्मी ठेव योजना •

मासिक ठेव रक्कम	३६ महिन्यानंतर मिळणारी रक्कम
रु. ५,०००/-	रु. २.०० लाख
रु. २,५००/-	रु. १.०० लाख
रु. १,२५०/-	रु. ५० हजार



वैभवलक्ष्मी ठेव

११.५० %

२५ महिन्यांकरिता

डबल धमाका

दामदुप्पट ठेव योजना आपली रक्कम ७७ महिन्यात दामदुप्पट

डबल धमाका

विविध कर्ज योजना

- **तत्काळ कर्ज** — सोने तारण कर्ज १० ग्रॅमला रु. १७,०००/- व्याजदर १३.५०%
- **वैयक्तीक कर्ज** — रु. ७५,०००/- व्याजदर १७%
- **वाहण तारण कर्ज** — रु. १०.०० लाख व्याजदर १५%
- **सुरक्षित तारण** — रु. २५.०० लाख पर्यंत व्याजदर १५.५०%
- **तारण कर्ज** — ठेव तारण LIC/NSC

पारिजात


को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

पॅनकार्ड सुविधा फक्त ९६/-


• खुशखबर •

पॅनकार्ड सुविधा फक्त ९६/-

केंद्र शासनाच्या आयकर विभागाने बंधनकारक केलेले



पॅनकार्ड



आता पारिजात संस्थेमार्फत सर्व नागरीकांस उपलब्ध

पतसंस्थेच्या माध्यमातून अशी सेवा देणारी 'पारिजात'
पहिली व एकमेव संस्था.



पारिजात

को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

• विद्यार्थी गौरव सोहळा

सन २०१२-१३



सभासदांच्या हुशार मुलांचा गुणगौरव वार्षिक सर्व साधारण सभेत केला जाणार आहे.
सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात
इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत कमीत कमी ७०% गुण असलेल्या
मुलांचे अर्ज दिनांक ०५/०८/२०१३ पर्यंत संस्थेच्या शाखा कार्यालयात
जमा करावेत. अधिक माहितीसाठी शाखा कार्यालयात संपर्क साधवा.

आपल्या सेवेत कार्यरत आमच्या शाखा

प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, प्लॉट नं.१८, सेक्टर-१० ए, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६.
दुरध्वनी क्र. : ०२२-२७७०५१२७ / ३२५९६९९०.

• मुंबई विभाग •

वाशी
अे-३/७, सेक्टर-१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.
फोन : २७८० २६५९ / ३२०८ ६६६४.

नेरुळ
साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं. २८, प्लॉट नं. १७, सेक्टर -८, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६. फोन : ३२५९ ६९८५.

दादर
मगनलाल डी-बिल्डींग, रुम नं. १६, पहिला मजला, कबुतरखान्याजवळ, स्टेशन रोड, दादर (प.), मुंबई - ४०० ०२८. फोन : ३२०८ ६६६५.

कोपरखैरणे
के. पी. हेरिटेज को-ऑप.हौ.सो., शॉप नं.१०, प्लॉट नं.४१, सेक्टर-७, पोस्ट ऑफिस समोर, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९. फोन : ३२४८ ६८०६.

न्यु पनवेल
ओमश्री निकेतन को-ऑप.हौ.सो., शॉप नं. ८, प्लॉट नं.१२ए, सेक्टर-१, महात्मा शाळेसमोर, खांदा कॉलनी, न्यु पनवेल - ४१० २०६. फोन : ३२६७४६५८.

• पुणे विभाग •

धनकवडी
सरस्वती मंगल कार्यालय, पहिला मजला, सर्व्हे नं.-२९/१, पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे - ४११ ०४३. फोन : ०२०-३२९० ६७४६.

हडपसर
शॉप नं. ४१, अमर समृद्धी कॉम्प्लेक्स, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापुर रोड, हडपसर, पुणे - ४११ ०२८. फोन : ०२० - ३२५१ ७६७१.

सिंहगड रोड
सुर्या प्लाझा, शॉप नं.१०, पहिला मजला, सर्वे नं.-८, धायरी रोड, वडगाव खुर्द, पुणे - ४११ ०४१. फोन : ०२०-३२५३ ११०२.

चंदननगर
बेंद्रे बिल्डींग, पहिला मजला, सर्व्हे नं.-४६/१, संघर्ष चौक, खराडी रोड, चंदननगर, पुणे - ४११ ०१४. फोन : ३२३१ १७२२.



महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. अंतर्गत ठाणे, जिल्हा बोर्ड आयोजित संचालक आणि कर्मचारी प्रशिक्षण प्रसंगी उपस्थित ठाणे जिल्हा बोर्डाचे अध्यक्ष **श्री. भाऊसाहेब कुऱ्हाडे आणि मान्यवर**



सन २०११-२०१२ **'उत्कृष्ट'** शाखा पुरस्कार स्विकारताना संस्थेच्या चंदनगनर शाखेचे कर्मचारी व ठेव प्रतिनीधी



संस्थेचे सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी **श्री. राजेंद्र कोंडे** (सिंहगड रोड शाखा) पुणे विभाग

संस्थेने आयोजित केलेल्या **'विद्यार्थी गुणगौरव '** कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थीनिस स्मृतीचिन्ह व पारीतोषिक देताना संस्थेच्या संचालिका सौ. मंदाताई खोपडे



पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई



संस्थेच्या सिंहगडरोड शाखा पुणे वर्धापनदिना निमित्त संस्थेने आयोजित केलेल्या मोफत रक्त तपासणी शिबिर प्रसंगी उपस्थित स्थानिक आमदार मा.श्री. भिमराव तापकिर आणि मान्यवर



मुख्य कार्यालय नेरुळ येथे संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त उपस्थित स्थानिक नगरसेवक व नवी मुंबई महानगर पालिकेचे विरोधीपक्ष नेते मा. श्री. दिलीप घोडेकर आणि मान्यवर



संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त उपस्थित नवी मुंबई को-ऑप. बँकेचे पदाधिकारी आणि मान्यवर संचालक



जेष्ठ नागरीक दिनाचे औचित्य साधुन संस्थेच्या हडपसर शाखेत जेष्ठ नागरीकांचा सत्कार व नविन ठेव योजना शुभारंभ प्रसंगी उपस्थित जेष्ठ खातेदार सभासद व संचालक मंडळ

प्रेषक :

पारिजात
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

पारिजात भवन, प्लॉट नं.१८, सेक्टर १० ए, नेरुळ (प.),
नवी मुंबई-४०० ७०६. फोन : ३२५९६९९०/२७७०५१२७
Email : parijatsociety@rediffmail.com / parijatsociety@gmail.com

बुक-पोस्ट

प्रति,

_____

_____

_____

_____